रे.स.के.नं.५७१ /२०१६

नि.क्र.७०/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | यशवंत हिरामन म्हात्रे |
| वय | - | ५२ वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी |
| राहणार | - | कामठा ता. उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती छापेकर यांच्यामार्फत...</u>**

१. ओनेक्स कंपनीमध्ये मी क्लर्क म्हणून काम करीत आहे. सन २०१६ साली मी नोकरीस नव्हतो. दिनांक २३.०६.२०१६ रोजी काँग्रेस कार्यालय इथे आमची मिटींग सुरू असताना पंडित घरत व त्यांच्या सोबत असणारी माणसे आम्हाला मारायला सुरवात केली. त्यांनी जे.डी. जोशी तालुका अध्यक्ष यांना मारहाण केली होती. त्यांनी मलादेखील मारहाण केली. माझ्या डोक्याला इजा झाली होती. जे.डी. जोशी यांना लाथा बुक्क्याने मारहाण केली होती. आरोपीचा काय राग होता हे मला सांगता येत नाही. सुरवातीला आम्ही पोलिस ठाणे उरण येथे गेलो. त्यानंतर मला पोलिसांनी सरकारी दवाखाना उरण येथे उपचारासाठी पाठविले. पोलिसांनी माझा जबाब घेतला होता. या आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. योगेश गांगण यांच्यामार्फत...</u>**

२. पोलिसांनी माझा जबाब दिनांक २३.०६.२०१६ रोजी घेतला.

पोलिसांनी त्यानंतर माझा जबाब नोंदविला नाही. पोलिसांनी माझा जबाब दिनांक २३.०६.२०१६ रोजी संध्याकाळी ७ ते ८ च्या सुमारास नोंदविला होता. हे म्हणणे खरे नाही की मी पोलिसांना माझ्या जबाबात असे सांगितले होते की माझ्या डोक्याला इजा झाली होती व जे.डी. जोशी यांना दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २३.०६.२०१६ मी सांगितल्याप्रमाणे वास्तविकता कुठल्याही प्रकारची घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला शिक्षा व्हावी म्हणून मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण,

(ल.मु.सय्यद)

दिनांक – ०९.१२.२०२४

न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

नि.क्र.७१ /क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | मिलिंद दत्तात्रेय पाडगावकर |
| वय | - | ६० वर्षे |
| व्यवसाय | - | सेवानिवृत्ती |
| राहणार | - | उरण, ता. उरण, जि. रायगड |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती छापेकर यांच्यामार्फत...**

१. सन २०१६ मध्ये मी बांधकाम क्षेत्रात काम करत होतो. दिनांक १५.०७.२०१६ रोजी आमची काँग्रेस कार्यालयात मिटींग चालू होती. सदर मिटींग पक्षाच्या संदर्भात होती. सदर मिटींग चालू असताना पंडीत घरत व काही माणसे अचानक मिटींग रूम मध्ये घुसले व गोधंळ केला. त्यांनी जे.डी जोशी यांच्या अंगावर मारायला धावून गेले. आरोपीने शिवीगाळ केली. जे.डी जोशी यांचे तोंड सुजलेले होते. सदर मारहाण व घटना पद काढण्यावरून झाली होती. मी काही आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. पोलिसांनी माझा जबाब घेतला होता.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. योगेश गांगण यांच्यामार्फत...**

२. पोलिसांनी घटनेच्या दिवशी माझा जबाब घेतला होता, साक्षीदार सांगतो की मला तारीख आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवसानंतर

पोलिसांनी मला कधीच जबाब नोंदविण्यासाठी बोलवले नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी माझ्या ओळखीचे नसल्याने मी पोलिसांना त्यांचे नाव सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे की, पोलिसांनी मला ओरोपीची ओळख पटविण्यासाठी कधीच पोलिस ठाण्यात बोलवले नाही. हे म्हणणे खरे घटनास्थळी लागून व्यायामशाळा, गार्डन, रीक्षास्टँड, पत्रकार कार्यालय आहे. हे म्हणणे खरे घटनास्थळ हे मुख्य रस्त्यावर आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सांगितलेला सरतपासातील सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझा पक्षाच्या असल्याने आरोपी विरूद्ध खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (ल.मु.सय्यद)

दिनांक – ०९.१२.२०२४ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

रे.स.के.नं.५७१ /२०१६
नि.क्र.७२ /क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | प्रकाश अनंत पाटील |
| वय | - | ६२ वर्षे |
| व्यवसाय | - | सिव्हील कॉन्ट्रॅक्टर |
| राहणार | - | कोटनाका , ता. उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती छापेकर यांच्यामार्फत...</u>**

१. सन २०१६ साली मी सिव्हील कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करीत होतो. १५.०७.२०१६ रोजी कॉंग्रेस कार्यालय उरण येथे आमची निवडणूक विषयावर बैठक चालू होती. पंढरी व त्याच्यासोबत इतर माणसे आमच्या कार्यालयात येऊन जे.डी. जोशी, यशवंत म्हात्रे यांना मारहाण केली. यशवंत म्हात्रे यांच्या डोळ्यावर जास्त मार लागला होता. इतर लोकांनी देखील सदर घटना बघितली होती. आरोपी पंडित यांना मी ओळखतो. बाकीच्या आरोपींना ओळखत नाही. पोलिसांनी माझा जबाब घेतला होता.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. योगेश गांगण यांच्यामार्फत...</u>**

२. पोलिसांनी माझा जबाब घटनेच्या दिवशी नोंदविला होता. त्यानंतर पोलिसांनी मला जबाब घेण्यासाठी बोलविले नव्हते. आरोपी पंडित याला ओळखायला

पोलिसांनी मला कधीच पोलिस ठाण्यात बोलवले नव्हते. पंढरीनाथ चे दुसरे नाव पंडित आहे ही माहिती मी पोलिसांना दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादीचे व माझे एकाच पक्षात असल्यामुळे चांगले संबंध आहेत . हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा व्हावी मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (ल.मु.सय्यद)

दिनांक – ०९.१२.२०२४ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण